स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 28–03–2016** रोजी **सायंकाळी 04–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. बंडू उर्फ सुधीर राऊत** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. राजू भाऊराव नागूलवार | सदस्य |
| 3. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्या |
| 4. | मा. श्री. जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 5. | मा. श्रीमती संगीता कळमकर | सदस्या |
| 6. | मा. श्री. रामदास गुडधे | सदस्या |
| 7. | मा. श्री. संजय महाकाळकर | सदस्या |
| 8. | मा. श्री. सुरेश जग्यासी | सदस्या |
| 9. | मा. श्रीमती कुमूदिनी कैकाडे | सदस्य |
| 10. | मा. श्रीमती इफ्तीखर अशरफू | सदस्य |
| 11. | मा. सौ. दिव्या धुरडे | सदस्या |
| 12. | मा. श्री. गणेश उर्फ मुन्ना पोकूलवार | सदस्य |
| 13. | मा. सौ. अश्विनी जिचकार | सदस्या |
| 14. | मा. सौ. सरिता तिवारी | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 2. | मा. श्री. अनिल धावडे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. सौ. नयना गुंडे, अति. आयुक्त
2. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
3. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 31ः– प्रभाग क्र. 32–ब स्मॉल फॅक्ट्री एरिया मध्ये सुदर्शन चौक ते शृती सेल्स पर्यंत रस्त्याचा विकास करण्याकरिता स्थायी समिती ठराव क्र. 580 दि. 13/02/2015 अन्वये मे. एस.के. मेहता यांची निम्नत्म निविदा रु. 51,47,234/– मंजूरी प्राप्त आहे. सदर रस्ता म.न.पा. च्या सिमेंट रस्त्या प्रकल्पा (आर.आर.डी.पी.) मध्ये समावेश केला असल्याने प्रथम चरणाचे कामा व्यतिरीक्त डांबरीकरणाचे काम करण्यात आले नाही. उर्वरीत अंदाजे रु. 30,10,975/– राशीचे कामास मौकाबदल सुचविले असून त्याप्रमाणे उर्वरीत

डांबरीकरणाचे मौकाबदलास (1. चंद्रहास बार ते सुलभ शौचालय, 2. रेडक्रास सोसायटी, 3. घासबाजार गोल बाजार रामपेठ, 4. चितेंश्वर मंदीर समोर रामपेठ, 5. पाटीदार भवन जवळील परिसर) स्थायी समितीची मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 32ः– पश्चिम नागपूर विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्र. ५३ मधील रामनगर येथील श्रीराम मंदीर नविनिकरण रू. ३६५४४०२४/– रकमेचा प्राकलनाप्रमाणे म.न.पा. च्या वित्तीय सहभागा करीता मंजूरी व या कामास्तव मे. भिवगडे ॲड असोसिएटस यांची प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्याचा प्रश्न विचारात घेणे त्याचप्रमाणे तिर्थक्षेत्रातील विकास कामाचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्याचा प्रश्न तसेच शासन निर्णय क्रमांक तिक्षेवि–२००२/५६८/प्र.क्र.८९/२००२/ नवि–१८दिनांक २४.०८.२०१४ तीर्थक्षेत्रांची निवड करणे आणि तिर्थक्षेत्र विकास योजनांचे आराखडे मंजूर करणे बाबतचे निकषानुसार “ब” श्रेणीतील स्थळांच्या बाबतीत तीर्थक्षेत्राच्या आराखडयाच्या एकूण खर्चाच्या ५० टक्के रक्कम शासनाने २५ टक्के रक्कम संबंधीत स्थानिक नागरी संस्थेने व २५ टक्के रक्कम संबंधीत मंदिराच्या ट्रस्टने/संस्थेने खर्च करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 33ः– नागपूर महानगरपालिकेची मानकापूर मराठी (सदर उर्दू) प्राथ. शाळा घरमालक श्री. प्रशांत भाऊराव ठाकरे यांचे घरी दि. 01.08.1996 पासून किरायाने सुरू आहे. व सद्यःस्थितीत त्याचे दरमहा भाडे रू. 900/– असून कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद वर्क्स डिव्हिजन नागपूर यांनी किरायाने असलेल्या या शाळेचे दरमहा भाडे दि. 01.01.2015 पासून पुढील 5 वर्षाकरिता म्हणजेच दि. 31.12.2019 पावेतो रू. 14,120/– निश्चित केले आहे. मालमत्ताधारक श्री. प्रशांत भाऊराव ठाकरे यांनी कार्यकारी अभियंता, वर्क्स डिव्हिजन यांनी निश्चित केलेले दरमहा भाडे मिळण्याची मागणी केली आहे.

कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद, वर्क्स डिव्हिजन यांनी दरमहा निश्चित केलेले भाडे रू. 14,120/– याप्रमाणे दि. 01.01.2015 पासून पुढील 5 वर्षाकरिता ( दि. 31.12.2019 पावेतो ) घरमालक श्री. प्रशांत भाऊराव ठाकरे यांना देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 34ः– प्रभाग क्र. 34 अ पाचझोपडा मिनीमातानगर ढोबळे ले–आऊट येथे रस्ते डांबरीकरण करणेस्तव प्राप्त निविदापैकी मे. लोटस कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 3 टक्के जास्त रु. 30,88,491/– रकमेची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 35ः– रिलायंस जिओ इंफोकॉम लि. यांना नामपाच्या पथदिव्यांच्या खांबावर केबल टाकण्याकरिता दिलेल्या परवानगिची मुदत दि. २३.१२.२०१५ ला संपलेली असून या अनुषंगाने में. रिलायंस जिओ इंफोकॉम लि. यांना केबल काढण्याकरीता पत्र देण्यात आले असले तरी सुध्दा में. रिलायंस

जिओ इंफोकॉम लि. यांनी केबल काढलेली नसल्यामुळे ही केबल म.न.पा.द्वारे काढण्यासाठी रु. ४० लक्ष च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन रिलायंस जिओ इंफोकॉम लि. यांच्या जमा असलेल्या सुरक्षा ठेवीची प्रशासनाने शहानिशा करावी जर प्रशासन समाधानी असेल व प्राकलनीय राशीच्या तुलनेत सुरक्षा ठेव असेल तर आयुक्तांनी योग्य निर्णय घ्यावा या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 36</u>ः— प्रभाग क्रं. ६५ अंतर्गत ज्ञानेश्वर नगर, कैलाश नगर येथील रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ४ निविदाकारांपैकी मे. डी.सी. गुरूबक्षाणी यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.००टक्के अधिक दराच्या निविदा राशी रु. २९,७७,३४६/— रकमेच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 37</u>ः— प्र. क्र. 1 ब येथी अहुजा नगर येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे. आर एम गोपलानी यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा 3.95 प्रतिशतने अधिक दराची रू. 31,18,490/— रकमेची सुधारीत निविदा, कामाचा खर्च मुळ प्राकलनीय राशी रू. 29,99,990/— पर्यंत सिमीत राहील या अटीवर स्विकृत करण्याबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 38</u>ः— नागपूर महानगरपालिका नागरी सुविधा मूलभूत सेवा व सुविधा पुरविण्यास कटिबद्ध असून म.न.पा.ने अनेक लोकोपयोगी निर्णय घेतलेले आहेत व घेत असते. परंतु त्याची प्रसिद्धी व प्रसार योग्यरित्या सामान्य नागरिकांपर्यंत पोहाचत नाही. तसेच आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून नवनवीन प्रचार व प्रसार माध्यमांची साधने प्रत होत आहे. त्या अनुषंगाने म.न.पा. करीता मॉडर्न कम्युनिकेशन चॅनेलचे व्यवस्थापन करण्यासाठी एजन्सी नियुक्ती करण्यास तसेच त्यासाठी निविदा बोलविण्यास व येणाऱ्या अंदाजे वार्षिक रु. ४२,३२,४००/— च्या खर्चास प्रशासकीय मान्यता व देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासनाने कार्यालयीन टिप्पणी मध्ये कामाचे वर्गीकरण केले आहे. त्यासह निविदा प्रपत्रात त्यांचा अंतर्भाव करुन निविदा काढव्या या सूचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 39</u>ः— प्रभाग क्र. ६२ (अ) अंतर्गत महात्मा गांधी नगर, अष्टविनायक कॉलोनी रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव मागविण्यात आलेल्या एकूण ०७ निविदाकारा पैकी मे. सेठ इन्फ्रास्ट्रक्चर यांची प्रथम निम्नतम निविदा मुळ प्राकलनीय दरापेक्षा ३.५ टक्के कमी दराच्या निविदा राशी रू. ५०,२६,८८४/— रकमेच्या निविदेस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 40</u>ः— प्रभाग क्र. ३४—ब सुभान नगर भारत नगर मधील अंतर्गत कॉक्रीट रस्ते बांधकामाकरीता प्राप्त निम्नतम निविदाकार मे. दिप कंस्ट्रक्शन यांची प्राकलीनय राशीपेक्षा १ टक्के कमी रू. ८०५२५८४/— निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 41</u>ः— नागपूर महानगरपालिकेच्या मा. पदाधिकारी, अधिकारी तसेच आवश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामाकरीता एकमेकांशी सुसवांद साधण्यासाठी नागपूर महानागपालिकेतर्फे मोबाईल सिमकार्ड सेवा पुरविण्यात आलेली आहे. मोबाईल सेवेचे दर निश्चित करण्याकरीता ई—निविदा मागविण्यात आली असता मे. वोडाफोन सेल्युलर लिमिटेड यांचे दर निम्नतम असल्यामुळे त्यांचे निम्नतम दरास तीन वर्षाच्या कालावधीकरीता मोबाईल सिमकार्ड सेवा पुरविण्यासाठी मंजुरी तसेच म.न.पा. मध्ये सुरू असलेली मे. भारती एअरटेलीची सेवा जोपर्यंत मे. वोडाफोन सेल्युलर लिमिटेडमध्ये पूर्ण मोबाईल नंबर पोर्ट होईस्तोवर सुरू ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 42</u>ः— प्रभाग क्र. 38 मधील अंतर्गत जुनाबगडगंज येथील दिघोरीकर चौक ते माटे चौक पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. दीप कन्स्ट्रक्शन यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा २२.९७ % कमी दराची रू. ७४,७८,६०८/— (चौऱ्याहत्तर लक्ष अठयात्तर हजार सहासे आठ) रकमेची निम्नतम निविदा अतिरिक्त सुरक्षाठेव ७.९७% जमा करण्याचे अटिवर मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 43</u>ः— प्रभाग क्र. 32 अंतर्गत क्वेटा कॉलोनी येथील नवरात्र गेट ते जयसिताराम अपार्टमेंट पर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त मे. एस. के. एन्टरप्राईजेस यांची मूळ प्राकलनीय दरापेक्षा २२.११% कमी दराची रू. ८१,७०,२०५/— (एक्यांशी लक्ष सत्तर हजार दोनशे पाच) रकमेची निम्नतम निविदा अतिरिक्त सुरक्षाठेव ७.११% जमा करण्याचे अटिवर मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 44</u> ः— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर